# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३७७/२०२३ दिनांक – २६/१०/२०२३

**बांधकाम कस्ट्रक्शन व जुन्या इमारतीमधील प्लॅट स्वत:च्या मालकी असल्याची समाजमाध्यमांवर जाहीरात करुन त्याची विक्री करुन लोकांची फसवणुक करणाऱ्या वसईत राहणाऱ्या परराज्यातील खोटया महाठग बिल्डरला अटक,**

**अचोळे पोलीस ठाणेची कामगीरी**

वसई परीसरामध्ये राहणारा सुमित वीरमणी दुबे वय-३० वर्षे, रा.बी/०१, हिरकुंज अर्पाटमेंन्ट, बाभोळा नाका, वसई प. ता.वसई जि.पालघर हा वसई परीसरामध्ये राहत असुन तो स्वत:ला बिल्डर असल्याचे सांगायचा. तासेच वेगळ्या परीसरातील नवीन बांधकाम कस्ट्रक्शन व जुन्या इमारतीमधील रिकामे प्लॅटचे तो स्वत: मालक असल्याचे भासवुन तो व त्यांचे हस्तक यांचेकरवी NO BROKAR.COM / ONLINE OLX तसेच इतर वेबसाईटवर रुम कमी किंमतीमध्ये खरेदी विक्री संबंधिची माहिती प्रसारीत करीत होता. त्याचप्रमाणे टुस्टार रियालीटी कंपनी तर्फे महालक्ष्मी बिल्डरर्स ॲण्ड डेव्हलपर्स बाबतची सोशल मिडीयावर जाहिरात टाकुन गरजु सर्व सामान्य लोकाकडुन प्लॅट बुकींगची रक्कम स्विकारायचा. रक्कम स्विकारलेल्या लोकांना प्लॅट न देता त्यांची फसवणुक करायचा. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचे बांधकाम न झालेले अस्तित्वात नसलेले प्लॅट लोकांना विक्री करुन त्यांची फसवणुक करायचा व त्या प्लॅटवर बॅककर्ज घेवुन सदरचे पैसे स्वत:च्या फायदया करीता वापरायचा आणि वसई, नालासोपारा परीसरातील लोकांना आपण मोठे बिल्डर असल्याचे भासवुन प्लॅट खरेदी करणारे लोकांना बांधकामाच्या वेगवेगळ्या साईट दाखवुन फसवणुक करण्याची पद्धत आहे.

अशाच प्रकारे सुमित दुबे व त्यांचे इतर साथीदार यांनी १) श्री. प्रविण अनंत मोरे व २) शोएब आलम मोहम्मद मुजीब अन्सारी यांना देखिल सुमित दुबे व त्यांचे साथीदार यांनी ज्याठिकाणी प्लॅट अस्तित्वात नाहीत अशा ठिकाणाचे प्लॅट हे कमी किंमतीत देतो असे म्हणुन त्यांचेकडुन ६,०५,४५४ रुपये स्विकारुन त्यांना प्लॅट न देता त्यांची फसवणुक केली होती. त्यामुळे आचोळे पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक I ५१४/२०२३, गुरनं I ५१५/२०२३ भादंविसंकलम ४२०,३४ प्रमाणे गुन्हा दिनांक २३/१०/२०२३ रोजी दाखल होता.

सदर गुन्ह्यातील लोकांची फसवणुक करणारा आरोपी सुमित वीरमणी दुबे हा त्याचे नाव सचिन पाटील, तुषार अशा नावांचा वापर करीत करायचा तसेच त्याचे साथीदार शुभम उर्फ बाबा गणेश मिश्रा व इतर त्याचेवर आचोळा, तुळींज, माणिकपुर पोलीस ठाणे येथे ठगबाजी फसवणुकीचे व इतर खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) तुळीज पोलीस ठाणे, गुरक्रं. I १३०/२०१६ भादंविसं कलम ३२४,५०४,३४ प्रमाणे
२) तुळीज पोलीस ठाणे, गुरक्रं. I ५३७/२०२० भादंविसं कलम ३२३,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६,४२७ प्रमाणे
३) तुळीज पोलीस ठाणे, गुरक्रं. I ९९९/२०२१ भादंविसं कलम ४२० प्रमाणे.
४) आचोळे पोलीस ठाणे, गुरक्रं. I १२३/२०२२ भादंविसं कलम ४२०,३४ प्रमाणे.
५) आचोळे पोलीस ठाणे, गुरक्रं. ५२५/२०२२ भादंविसं कलम ४२०,४०६,४६५,४६८,४७०,३४ प्रमाणे.
६) माणिकपुर पोलीस ठाणे, गुरक्रं. ३६५/२०२१ भादंविसं कलम ३७६ सह पोक्सो ४,८,१२ प्रमाणे
७) माणिकपुर पोलीस ठाणे, गुरक्रं. ३२७/२०२२ भादविस कमल ४३८,४२०,३४ प्रमाणे.
८) आचोळे पोलीस ठाणे गु.र.नं ५१४/२०२३ भादंविसं कलम ४२०,३४ प्रमाणे
९) आचोळे पोलीस ठाणे गु.र.नं ५१५/२०२३ भादंविसं कलम ४२०,३४ प्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

वरील प्रमाणे ठग इसमाचे विरुद्ध गुन्हे दाखल असुन तो ठगबाजी फसवणुक करण्यात मास्टर माईड असुन त्याने अनेक सर्वसामन्य लोकांची फसवणुक केली आहे.

वरील नमुद गुन्ह्यात महाठग आरोपी सुमित वीरमणी दुबे यास दिनांक २३/१०/२०२३ रोजी अटक करण्यात आली असुन सध्या पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे.

**तरी वसई, विरार, नालासोपारा परीसरामधील ज्या इसमांना सुमित दुबे व त्याचे साथीदार यांनी ठगइसमानी प्लॅट विक्रीचे खरेदी व्यवहार करुन प्लॅट न देता त्यांचेकडुन रक्कम स्विकारुन फसवणुक केली आहे. अशा इसमांची आचोळे पोलीस ठाणे येथे हजर राहुन आपली झालीले फसवणुकीबाबत रितसर तक्रार करावी असे आवाहन करीत आहोत.**

सदरचे गुन्ह्याचा तपास मा. श्रीमती पोर्णिमा चौघुले/श्रींगी, पोलीस उप आयुक्त सो. परीमंडळ-२ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त सो. तुळींज विभाग, आचोळे पोलीस ठाणेचे श्री. बाळासाहेब पवार वरीष्ठ पोलीस निरीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विवेक सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. यशपाल सुर्यवंशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक नेमणुक आचोळे पोलीस ठाणे हे करत आहे.